# ऋणनिर्देश

''डॉ. सौ. प्रतिमा इंगोले यांच्या 'वऱ्हाडी लोकगाथा' या पुस्तकातील स्त्री-विश्व'' हा विषय एम्.फिल.च्या शोध प्रबंधासाठी निवडला. पण त्यासाठी मराठी विभाग (शिवाजी विदयापीठ) तसेच मार्गदर्शक डॉ. सौ. सुलक्षणा दिलीप कुलकर्णी यांच्याशी प्रत्यक्ष चर्चा करूनच विषय निश्चित केला.

प्रबंध विषय निश्चित करताना त्यामध्ये आपली आवड असेल तर तो अभ्यास आपण अधिक चांगल्या प्रकारे करू शकतो. स्त्री जीवनाबद्दल लिहायला मला आवडेल याबद्दल विश्वास वाटल्याने देखील या विषयाबाबतचे आकर्षण निर्माण झाले. त्यातच M.A.- I ला लोकसाहित्य विषय नव्याने अभ्यासल्याने त्यातील लोकगीते मनाला अधिक भावली होती. त्यामुळे वरील सर्व आवडीच्या संयोगाने प्रस्तुत प्रबंधविषय साकार झाला. माझी ही आवड माझ्या मार्गदर्शक प्राध्यापिका डॉ. सौ. सुलक्षणा कुलकर्णी यांनी बरोबर ओळखली. त्यामुळे त्यांनी प्रस्तुत विषय मला सांगितला त्याबरोबर मी देखील त्याला होकार दिला आणि या विषयात अभ्यास करण्याची संधी मिळाली. माझ्या कुवतीप्रमाणे हा विषय प्रबंधाद्वारे मांडण्याचा मी प्रयत्न केला आहे.

यामध्ये एकूण सहा प्रकरणांचा विचार केला आहे. 'लोकसाहित्य व लोकगीते यांच्या व्याख्या व स्वरूप' या पहिल्या प्रकरणात अधिक विस्तार न करता शक्य तेवढी व आवश्यक अशी माहिती दिली आहे. 'प्रतिमा इंगोले यांचा परिचय, वाङ्मय व वऱ्हाडी लोकगाथेचे स्वरूप' यामध्ये प्रतिमा इंगोले यांचे बालपण, त्यांचे साहित्य, पुरस्कार व पुस्तकाचे स्वरूप थोडक्यात सांगितले आहे. तसेच पुढील तीन प्रकरणांत स्त्रियांचे अनुक्रमे कौटुंबिक, सामाजिक व सांस्कृतिक जीवन गीतांच्या आधारे विशद केले आहे. 'वऱ्हाडी लोकगाथेमधील संग्रहित लोकगीतांचे वाङ्मयीन मूल्यमापन' या प्रकरणात वाङ्मयीन मूल्यमापनाचे निकष सांगितले आहेत. निष्कर्ष प्रकरणात सर्व प्रकरणांचा आढावा घेतला आहे. परिशिष्टमध्ये प्रतिमा इंगोले यांची मुलाखत व त्यांचा परिचय दिला आहे. या क्रमाने शोध निबंध तयार केला आहे.

प्रस्तुत प्रबंधविषयाची निवड करण्यापासून ते प्रबंध पूर्णत्वाला नेईपर्यंत अनेक अडचणी आल्या पण या अडचणी दूर करण्यात व वेळोवेळी मार्गदर्शन करण्यात कुटुंबातील तसेच कॉलेजमधील प्राध्यापक वर्गानी खूप मदत केली. यामध्ये सर्वप्रथम मी वडील तुकाराम धोंडी कांबळे व आई सौ. लिलावती तुकाराम कांबळे यांची फार ऋणी आहे. कारण सतत स्फूर्ति देऊन, प्रबंध वेळेत पुरा करण्यासाठी त्या दोघांनीही खूप मार्गदर्शन केले. आलेल्या कौटुंबिक अडचणी सावरण्यातही त्यांनी फार मदत केली. त्यामुळे

त्यांची मी सदैव ऋणी राहील. यानंतर माझे पती श्री. प्रशांत रामचंद्र पवार यांचीही ऋणी आहे. सतत प्रबंधाचे काम कसे चालले आहे, कुठपर्यंत आले आहे याची विचारपूस केल्याने मनाला मोठा आधार मिळाला आहे. तसेच प्रबंध पूर्ण करतानाच्या अनेक कामातही मदत केली आहे. त्यामुळे त्यांचे सहकार्य अनमोल ठरले. तसेच माझा लहान भाऊ संदीप तुकाराम कांबळे यानेही फार मोलाची मदत केली. तसेच माझे सासु-सासरे, माझ्या दोन बहिणी यांनीही सहकार्य केले या सर्वांचे मी अगदी मनापासून आभार मानते. या सर्वांच्या ऋणात मी सदैव राहीन.

कौटुंबिक आधाराबरोबर शैक्षणिकदृष्टया मार्गदर्शन अतिशय महत्वाचे असते. त्यासाठी प्रथम माझ्या मार्गदर्शक डॉ.सौ. सुलक्षणा कुलकर्णी यांचे ऋण न विसरता येण्यासारखे आहे. आईच्या मायेने मार्गदर्शन करून आत्मविश्वास जागविणाऱ्या मॅडमचे आभार मी आजन्म स्मरणात ठेवीन तसेच या कामासाठी प्रोत्साहन देणारे प्राचार्य डी.जी. कणसे (मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविदयालय, कडेगांव) यांनीही वेळोवेळी प्रोत्साहन दिले. याच कॉलेजच्या डॉ.सौ. पाडाळकर मॅडम, सौ. घाटगे मॅडम यांनीही मार्गदर्शन केले. त्याबरोबर एम्.फिल.च्या अभ्यासक्रमाला प्रवेश घेऊन तो पूर्ण करण्यासाठी सहकार्य करणारे आदरणीय प्राचार्य मोहन राजमाने (सद्गुरू गाडगे महाराज कॉलेज, कराड), मराठी विभाग प्रमुख डॉ. संभाजीराव देसाई (स.गा.म. कॉलेज, कराड) तसेच याच कॉलेजच्या डॉ. रेश्मा दिवेकर, निकम मॅडम, रैनाक मॅडम यांनी सतत मार्गदर्शन केले आहे. प्रवेश घेतल्यापासून या सर्वांनी अतिशय मोलाचे सहकार्य केले आहे. त्यामुळे वरील सर्वांच्या सहकार्याबद्दल मी कृतज्ञ राहीन.

त्याचबरोबर प्रबंधासाठी आवश्यक पुस्तके वेळेत मिळवून देण्यात अनेकांनी सहकार्य केले. त्यामध्ये 'सद्गुरू गाडगे महाराज' कॉलेज कराडचे ग्रंथालय, मातोश्री बयाबाई श्रीपतराव कदम कन्या महाविदयालय, कडेगांवचे ग्रंथालय यामधील सर्व ग्रंथपालांनी सहकार्य केल्याबद्दल त्यांचीही मी आभारी आहे. तसेच प्रस्तुत प्रबंधाची संगणकाद्वारे जुळणी करणाऱ्या व हा प्रबंध वेळेत पूर्ण करण्यास मदत करणाऱ्या ज्योती टायपिंग, कराडच्या सौ. सुनिता नांदेडकर यांचीही मी आभारी आहे.

वरील सर्वांच्या सहकार्याबद्दल पुन्हा एकदा कृतज्ञता व्यक्त करून त्यांचे असेच सहकार्य यापुढेही मिळेल ही आशा बाळगते व इथेच थांबते.

(विजया कांबळे)